| | | | |
|---|---|---|---|
| MHLA120009742015 | केस दाखल दिनांक | | १६/०५/२०१५ |
| | केस नोंदणी दिनांक | | २९/०६/२०१५ |
| | केस निकाल दिनांक | | १७/०६/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष महिने दिवस<br>– |

**निशाणी क्र.–५२**

**भाग अ**

| | | |
|---|---|---|
| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, निलंगा यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी – श्रीमती ए.एस. गुंजवटे )**<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ११००३८५/२०१५** | | |
| | | गु.र.क्र. ३०२३/२०१५<br>पोलिस स्टेशन – औराद शहा.,<br>ता. निलंगा, जि. लातूर. |
| फिर्यादी | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस स्टेशन औराद शहा.,<br>ता. निलंगा, जि. लातूर. |
| प्रतिनिधीत्व | | सहायक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे |
| | | **विरुध्द** |
| आरोपी | १.<br><br><br><br>२. | **प्रकाश माधवराव उपलगे (मयत)**<br>वय ५० वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>रा. अबुलगा(बु.), ता. निलंगा, जि. लातूर.<br><br>**अनिल राजेंद्र जाधव,** |

| | | |
|---|---|---|
| | | वय २५ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>रा. अण्णाभाऊ साठे नगर, ता. निलंगा, जि. लातूर. |
| प्रतिनिधीत्व | | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एच.व्ही.अलमले |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | ३०/०३/२०१५ |
| फिर्याद दाखल दिनांक | ३०/०३/२०१५ |
| दोषारोप दाखल दिनांक | १३/०५/२०१५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २३/११/२०१५ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | १५/०२/२०२० |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | १७/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | १७/०६/२०२६ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | -- |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश माधवराव उपलगे | ३०.०३.२०१५ | ३०.०३.२०१५ | कलम ४१, ४२, २६ (फ), | मयत | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (मयत) | | | ३३(अ) महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम कलम ३ व ४ आणि मोटरवाहन कायदा कलम ३(१) सह कलम ११२ | | | |

## न्यायनिर्णय

(१७ जुन २०२६ रोजी अधिघोषित)

आरोपी क्र.१ हा खटला प्रलंबित असताना मयत झाला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा खटला आरोपी क्र. २ विरुध्द कलम ४१, ४२, २६ (फ), ३३(अ) महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम कलम ३ व ४ आणि मोटरवाहन कायदा कलम ३(१) सह कलम ११२ या गुन्हासाठी चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२) दिनांक ३०/०३/२०१५ रोजी १७.०० वा.च्या सुमारास औराद ते निलंगा रोडने दोन इसम मोटारसायकलवर चंदनाचे लाकडे घेऊन जाणार असल्याची फिर्यादीला बातमी मिळाली होती. त्याप्रमाणे मसोबावाडी येथे पाटीवर जाऊन फिर्यादी दोन पंचांना घेऊन थांबले असताना एक होंडा शाईन कंपनीची मोटारसायकल हलगराकडून

निलंगाकडे ज्यावर दोन इसमांकडे चंदनाचे लाकडे घेऊन जाताना दिसली. त्यांनी त्याच्याकडे थांबुन चौकशी केली असता त्या गाठोड्यामध्ये चंदनाची लाकडे, गाभा असल्याचे त्यांनी सांगीतले. ते गाठोडे पंचासमक्ष पाहणी करता त्यामध्ये चंदनाचा गाभा असलेली लाकडे व चंदनाचे धपला मिळून आले. त्या मोटारसायकलचा नंबर एम.एच.२४ ए.ए. ४८९० असा होता. ते चंदन दोन पंचांच्या समक्ष जप्त करुन ताब्यात घेतले. आरोपींनी बेकायदेशीररित्या विनापरवाना चंदनाच्या लाकडाची वाहतुक करत असताना मिळून आला म्हणून प्रस्तुतची फिर्याद फिर्यादीने दाखल केली.

३) या फिर्यादीवरून औराद शहा. पोलीस स्टेशन, ता. निलंगा, जि. लातूर येथे गु.र.क्र. ३०२३/२०१५ नोंदवण्यात येवुन त्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोडे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा केला. सदर प्रकरणात गुन्हा घडल्याचे निष्पन्न होत असल्यामुळे त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात हजर केले.

४) माझ्या पुर्वीच्या पिठासिन अधिकारी यांनी निशाणी २१ वर आरोपीच्या विरुध्द दोषारोप निश्चित केले. सदरचे दोषारोप आरोपीला मराठी भाषेत वाचुन दाखवुन समजावुन सांगीतला असता आरोपीने त्याच्याविरुध्दचे दोषारोप नाकारले व त्याच्याविरुध्द खटला चालविण्याची विनंती केली.

५) आरोपीच्याविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोग

०५ साक्षीदार तपासले आहेत. आरोपीविरुध्द सदर गुन्हयाच्या अनुषंगाने अभिलेखावर आलेला पुरावा विचारात घेऊन आरोपी क्र.२ चे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) ब अन्वये नोंदविले जाणारे निवेदन निशाणी ४९ वर नोंदवण्यात आले.

६) अभियोग पक्षाने विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एन. मेहेत्रे व आरोपी तर्फे वकील एच. व्ही. आलमले यांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला.

७) खटल्यामधील साक्षीपुराव्याचे अवलोकन करता, प्रस्तुत खटल्याचे न्यायानिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विचारार्थ प्रस्तुत होतात त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०/०३/२०१५ रोजी १७.०० वा.च्या सुमारास औरद ते निलंगा दरम्यान रोडवर मसोबा पाटीवर आरोपी क्र.१ व २ यांनी आपसात संगनमत करुन त्याच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच. २४ ए.ए. ४८९० वरुन शासनाच्या परवानगी शिवाय चंदनाचे झाड तोडून चंदन वाहतुक करताना असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | आरोपी क्र. २ची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ –**

८) साक्षीदार क्रमांक १ व ३ हे घटनास्थळ व जप्ती पंच आहेत. परंतु सा.क्र. १ व ३ यांनी अभियोग पक्षास साथ दिलेली नाही. त्यांच्या उलटतपासात त्यांच्यावर विश्वास ठेवावा अशी कोणतीही परिस्थिती समोर आलेली नाही.

९) चंदन आरोपीच्या ताब्यातून जप्त केल्याबाबतचा जप्ती पंचनामा आणि घटनास्थळ पंचनामा शाबीत होवू शकलेला नाही. साक्षीदार क्र.२ व ४ यांनी देखील अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. साक्षीदार क्र.५ हे प्रस्तुत गुन्ह्यातील तपासिक अधिकारी आहेत. त्यांच्या जबाबामधून दि. ३०/०५/२०१५ रोजी त्यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली होती की, दोन इसम मोटरसायकलवर चंदनाचे लाकुड घेवुन जात आहेत. त्यांनी दोन पंचांना बोलावून औराद त निलंगा जाणा–या रोडवर शाईन मोटरसायकल व त्यांचे गाठोडे बघितले होते. ते गाठोडे पंचांच्या समक्ष जप्त केले होते. त्यामध्ये दोन चंदानाची लाकडे मिळून आली होती. तसेच त्यांनी सदर गुन्ह्याचा तपास केला होता असे सांगितले. सदर गुन्ह्यातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा जबाब नोंदवता आलेला नाही. प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळ पंच आणि जप्ती पंच या साक्षीदारांशिवाय इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. त्यामुळे आरोपीकडून तात्काळ मुद्देमाल प्राप्त झाला असता

तर भारतीय पुरावा कायदा कलम ११४ अन्वये ते चोर आहेत असे गृहीतक काढण्यासारखी स्थिती सकृतदर्शनी निर्माण झाली असती परंतू तशी कोणतीही जप्ती अभियोग पक्षाने पुर्ण संशयापलीकडे शाबीत केलेली नाही. तसेच आरोपीने शासनाच्या परवानगीशिवाय चंदनाचे झाड तोडून चंदनाची वाहतुक केली ही बाब शाबीत केलेली नाही. म्हणून आरोपींनी सदर गुन्हा केला आहे हे शाबीत होत नाही. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२–**

१०) वरील चर्चेबरोबर अभियोग पक्षास आरोपीवरील दोषारोप सबळ पुराव्याआधारे शाबीत न करता आल्याचे स्पष्ट होते. यापुर्वीच जप्त होंडा शाईन कंपनीची मोटरसायकल क्रमांक एम.एच. २४ ए.ए. ४८९० मुळ मालकास परत देण्यात आलेली आहे. सबब, मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षात मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.२ अनिल राजेंद्र जाधव रा. अण्णाभाऊ साठे नगर,निलंगा ता. निलंगा जि. लातूर याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार कलम ४१, ४२, २६ (फ), ३३(अ) महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम कलम ३ व ४ आणि मोटरवाहन कायदा कलम ३(१) सह कलम ११२ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र.२ ने दिलेला जामीन कदबा व वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपी क्र.२ ने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये अपील कालावधीसाठी व अपील दाखल झाल्यास त्यामध्ये विनाविलंब हजर राहण्याच्या हमीसाठी रक्कम रू.१५,०००/– चा नवीन वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा तात्काळ सादर करावा.

४. जप्त मोटरसायकल क्रमांक एम.एच. २४ ए.ए.४८९० मुळ मालकास परत देण्यात आलेली असल्याने सदर सुपुर्तनामा रद्द करण्यात येत आहे.

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.17 13:33:03 +0530

(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)

**दिनांकः–१७/०६/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.**
**ठिकाणः–निलंगा** **जिल्हा लातूर.**
**(न्यायालय क्र.०१)**

**<u>भाग क</u>**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | गोविंद गुंडाप्पा चिंते | घटनास्थळ व जप्ती पंच |
| २. | शिवाजी पंडित दाडगे | साक्षीदार |
| ३. | चंद्रकांत गोपाळ दाडगे | घटनास्थळ व जप्ती पंच |

| | | |
|---|---|---|
| ४. | महादेव गोविंदराव बोळंगे | साक्षीदार |
| ५. | नागनाथ त्र्यंबक कोडे | तपासी अधिकारी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| **साक्षीदार क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| १. | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| **साक्षीदार क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष/ आरोपी/ न्यायालयीन पुराव्यांची यादी

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| **निशाणी क्र.** | **कागदपत्राचे वर्णन** |
|---|---|
| ४६ | फिर्याद |
| ४७ | घटनास्थळ व जप्ती पंचनामा |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| **निशाणी क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन पुरावा**

| **निशाणी क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| | निरंक | |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | निरंक |